दूरध्वनी क्र. २६३८३००१/२६३८३०१६
Email ID: ddadm.des@hotmail.com
dydiradm.des@maharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय
प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा, ८ वा मजला, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

क्रमांक:-पदोन्नती/१५२१/गट-ड-लिटं/प्र.क्र.१०९/प्रशा-२/ ६७८ दिनांक :- १८/०६/२०२१

**वाचा** :- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५१/का-१२, दिनांक १ ऑगस्ट, २०१९.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ७ मे, २०२१.

**कार्यालयीन आदेश**

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या गट-ड मधील खालील कर्मचारी संचालनालयाच्या गट-क मधील लिपिक-टंकलेखक या पदावरील पदोन्नतीसाठी आवश्यक असलेल्या अटींची पूर्तता करीत आहेत. तसेच सदर कर्मचाऱ्यांनी मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. गतीचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र सादर केल्याने त्यांना गट-ड मधील चपराशी पदावरुन गट-क मधील 'लिपिक-टंकलेखक' या पदावर सुधारीत वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर **S-६: १९९००-६३२००** या वेतनश्रेणीत खालील सेवाशर्तीच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नतीनंतर या कर्मचाऱ्यांची पदस्थापना पुढील आदेश होईपर्यंत खालील तक्त्यात त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या लिपिक-टंकलेखकाच्या रिक्त पदावर करण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **शिपाई पदावरील कर्मचाऱ्याचे नाव व सध्याचे कार्यालय** | **कर्मचाऱ्याचा प्रवर्ग** | **पदोन्नतीनंतर लिपिक-टंकलेखक पदी पदस्थापना करण्यात आलेले कार्यालय** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | श्री.हर्षद गिरीश देशपांडे, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद | खुला ( अपंग OA व OL) | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद | श्री.म.सु.जोशी यांच्या पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या पदावर |
| २. | श्रीमती निता गणेश मोरे (श्रीमती निता चंद्रकांत दोंडे), जिल्हा सांख्यिकी कार्यालय, सातारा | खुला | जिल्हा सांख्यिकी कार्यालय, कोल्हापूर | श्रीम.सु.श्री.घोरपडे यांच्या पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या पदावर |
| ३. | श्रीमती रंजना ज्ञानेश्वर मोहोड, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अमरावती | अजा | जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अमरावती | श्रीम.शि.शा.मुसळे यांच्या पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या पदावर |

| अ. क्र. | शिपाई पदावरील कर्मचाऱ्याचे नाव व सध्याचे कार्यालय | कर्मचाऱ्याचा प्रवर्ग | पदोन्नतीनंतर लिपिक-टंकलेखक पदी पदस्थापना करण्यात आलेले कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ४. | श्री.यशोधन ब्रम्हानंद होळकर,<br>जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>सोलापूर. | अजा | जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>सोलापूर | श्री.ग.अ.खांडेकर यांच्या पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या पदावर |
| ५. | श्री. महेश विनायक बर्डे,<br>जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>अहमदनगर | अज | जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>अहमदनगर | |
| ६. | श्री. अतुल गोपाळराव हुलके,<br>अर्थ व सांख्यिकी संचालनालय,<br>प्रादेशिक कार्यालय,<br>नागपूर | इमाव | जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>वर्धा | श्री.न.प्रे.रोठोड यांच्या पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या पदावर |
| ७. | श्री. मंगेश अनिलराव जाधव,<br>जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>गडचिरोली | इमाव | जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>यवतमाळ | श्री.नि.स.वसतकर यांच्या पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या पदावर |
| ८. | श्रीमती दिपा देविदास पोळकर,<br>जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>नांदेड | अजा | जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>नांदेड | श्री.सु.ज.शिंदे यांच्या पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या पदावर |
| ९. | श्री. त्र्यंबक निवृत्ती पानसरे,<br>जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>धुळे | भज-ड<br>(अपंग OL) | अर्थ व सांख्यिकी संचालनालय,<br>प्रादेशिक कार्यालय,<br>नाशिक | |
| १०. | श्री.अशरोबा बाळासाहेब जोरवर,<br>जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>हिंगोली | भज-क | जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>हिंगोली | श्री.अ.ब.राठोड यांच्या पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या पदावर |
| ११. | श्रीमती योगिता सचिन तायडे<br>(श्रीमती योगिता भिमराव पोहेकर),<br>अर्थ व सांख्यिकी संचालनालय,<br>प्रादेशिक कार्यालय,<br>अमरावती | इमाव<br>(अपंग) | अर्थ व सांख्यिकी संचालनालय,<br>प्रादेशिक कार्यालय,<br>अमरावती | श्रीम.कु.र.गावंडे यांच्या पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या पदावर |
| १२. | श्रीम.अश्विनी गणेश शिंगाडे<br>(श्रीमती अश्विनी पां. भिसे),<br>अर्थ व सांख्यिकी संचालनालय,<br>प्रादेशिक कार्यालय,<br>नवी मुंबई | भज-क | अर्थ व सांख्यिकी संचालनालय,<br>प्रादेशिक कार्यालय,<br>नवी मुंबई | श्री.वि.ह.कांबळे यांच्या पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या पदावर |
| १३. | श्री.वैभव दादाराव करवर,<br>जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>उस्मानाबाद | भज-क | जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>लातूर | श्रीम.स.द.वाघमारे यांच्या पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या पदावर |

## "सेवाशर्ती"

१) सदरची पदोन्नती ही प्रशासकीय निकड म्हणून तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नती राहील.

२) जर सूट मिळू शकत नसेल तर त्यांना एतदर्थ मंडळाच्या हिंदी व मराठी भाषा (निम्नस्तर व उच्चस्तर) परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण व्हावी लागेल. यासंदर्भात त्यांनी स्वतंत्रपणे अर्ज संचालनालयाकडे सादर करावा.

३) या संचालनालयामार्फत घेतल्या जाणाऱ्या विभागीय परीक्षेत त्यांना उत्तीर्ण व्हावे लागेल.

४) महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/ वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम १९९९ अन्वये शासकीय सेवेतील गट-क पदावरील कर्मचा-यांना संगणक हाताळणी/ वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्यात आले आहे. त्यानुसार माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४/०२/२०१३ मध्ये नमूद केलेल्या संगणक माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेले व्यवसाय शिक्षण मंडळामार्फत चालविण्यात येणारे संगणक विषयी अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्र पदोन्नती स्विकारण्याच्या वेळेस उपलब्ध नसल्यास रूजू झाल्यापासून दोन वर्षाच्या आत संचालनालयास सादर करावीत. यासाठी त्यांना कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही अथवा यासंदर्भात त्यांचे निवेदन स्विकारले जाणार नाही. परिणामी उक्त दोन वर्षाचा कालावधी संपताच त्यांची पदोन्नती आपोआप संपुष्टात येईल व त्यांना निम्न संवर्गात पदावनत करण्यात येईल.

५) या आदेशानुसार पदोन्नत होणा-या कर्मचा-यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ (दुसरी सुधारणा) नियम १९९३ मधील नियम ११ (१) ख़ालील परंतुकानुसार पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतील वेतननिश्चितीसाठी द्यावयाचा विकल्प पदोन्नतीच्या पदावर रूजू झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आस्थापना अधिकारी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई / कार्यालय प्रमुख यांच्याकडे द्यावा. त्यानंतर दिलेल्या विकल्पांचा विचार केला जाणार नाही आणि अशा कर्मचा-यांना विकल्प द्यावयाचा नाही असे गृहीत धरुन त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ (एक)(ए) खाली केली जाईल.

६) सदर पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ व विशेष अनुमती याचिका क्र.२५१८१/२०१८ व त्यातील आय.ए. क्र.२५९०/२०१९ मध्ये होणा-या

निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१ व रिट पिटीशन क्र.(स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ यामधील आय.ए.(स्टॅम्प) क्र.१०९११/२०२१ व १०९१०/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयान्वये पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे दिनांक २५/०५/२००४ च्या सेवाजेष्ठतेस अनुसरुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात येत आहे.

७) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, दिनांक १६/५/२००७ तसेच आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:एसटीसी-१४-२०००/प्र.क्र.४३/का.१०, दिनांक १३/४/२००० व दिनांक २८/५/२००१ मधील तरतुदींनुसार मागासवर्गीयांचे जात प्रमाणपत्र वैध असल्याशिवाय पदोन्नती देता येत नाही. परिणामत: निवड सूचीमधील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांपैकी ज्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या जातीचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे अशाच कर्मचाऱ्यांना या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत आहे. उपरोक्त कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठता यथावकाश निश्चित करण्यात येतील.

८) सदर आदेश निर्गमित झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत पदोन्नतीच्या पदाचा पदभार स्वीकारावा.

९) संबंधित विभाग/ कार्यालय प्रमुखांनी या आदेशात अंतर्भूत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेच्या पदावर रूजू होण्यासाठी स्थानिकरित्या व्यवस्था करून तात्काळ कार्यमुक्त करावे व कर्मचाऱ्यांच्या कार्यमुक्ततेचे/ रूजू झाल्याचे आदेश संचालनालयास त्वरीत पाठवावेत.

(र.र.शिंगे)
संचालक,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

प्रति,
श्री/श्रीमती --------------------------------
शिपाई
--------------------------------------------
--------------------------------------------

प्रत :

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३. कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग (का-१४२६), मंत्रालय, मुंबई.
४. सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय (सर्व).
५. जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय सातारा/ कोल्हापूर/ अमरावती/ सोलापूर/ अहमदनगर/ वर्धा/ गडचिरोली/ यवतमाळ/ नांदेड/ धुळे/ हिंगोली/ उस्मानाबाद/ लातूर.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय सातारा/ कोल्हापूर/ अमरावती/ सोलापूर/ अहमदनगर/ वर्धा/ गडचिरोली/ यवतमाळ / नांदेड/ धुळे/ हिंगोली/ उस्मानाबाद/ लातूर.

* संबंधित कर्मचाऱ्याचे नियुक्तीच्या पदावरील विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख संबंधित कर्मचाऱ्यांच्या सध्याच्या पदावरील व नियुक्तीच्या पदावरील विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, सदर आदेश संचालनालयाच्या www.mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असल्याने सदर आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करणे अथवा हजर करून घेण्याबाबत संकेतस्थळावरील प्रत ग्राह्य धरण्यात यावी.

प्रत :

१. अपर संचालक (सर्व) []
२. सह संचालक (सर्व) []
३. प्रशासन १/२/३/४ []
४. ज्येष्ठतासूची कार्यासन (प्रशा-२) []
५. मुख्य संगणक नोंदवही []
६. सेवापुस्तक कार्यासन (प्रशा-४) []
७. निवड नस्ती

अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
मुख्य कार्यालय, मुंबई.